

# महाराष्ट्र शासन
# अर्थसंकल्प २०१५-१६
# सर्वसाधारण चर्चा

**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे -४०१ २०८ ☎ ०२५०-२३९०१०३
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

**-संपादक-**

मुक्ता भारती

**-विश्लेषक-**

**रुपेश कीर -९८९२९३९६१७**
**गुरुनाथ सावंत -९९६७७२२९०७**



**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी



**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. ठाणे -४०१ २०८

दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


**लोकशाही बळकट करण्याकरिता**
**उपेक्षितांचे 'समर्थन'**

**समर्थन विषयी थोडेसे**

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर**

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# योजना: अंदाजीत पेक्षा प्रत्यक्ष खर्च सातत्याने कमी होत जातोय!

आलेख क्र. १ राज्य अर्थसंकल्पातील योजनांतर्गत खर्च




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २६३०५ | २७१६६ | ३६५९७ | ४५७९६ | ४९७१५ | ५२५२९ | ५६९५१ | ७१६३७ |
| सुधारित अंदाज | २९३७१ | ३५९०८ | ३८०६० | ४०६१० | ४४९४२ | ५१०८६ | ६१५८४ | |
| प्रत्यक्ष खर्च | २५६९२ | ३१८७८ | ३३२५६ | ३७५०७ | ४०३२३ | ४५१५२ | | |

स्त्रोत: खर्चाचे प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा

*टीप : वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज, वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज.)*

- वर्ष २०१५-१६ चा अर्थसंकल्पातील योजनांतर्गत खर्चाचे अंदाज रु. ७१ हजार ६३७ कोटी इतके आहेत. जो मागील वर्षी रु. ५६ हजार ९५१ इतके होते.
- वर्ष २०१४-१५ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु.५६ हजार ९५१ कोटी होते. मात्र आता सुधारीत अंदाज रु. ६१ हजार ५८४ कोटी केलेले आहेत म्हणजे सुधारित अंदाजात ४ हजार ६३३ कोटींची वाढ झाली आहे. मात्र तेवढा निधी प्रत्यक्षात उपलब्ध होईल असे सांगता येत नाही.
- वर्ष २०१३-१४ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ५२ हजार ५२९ कोटी होते. मात्र त्या वर्षी उपलब्ध झालेला निधी हा रु. ४५ हजार १५२ कोटी होता. म्हणजेच रु. ७ हजार ३७७ कोटींचा निधी (१४.०४%) कमी उपलब्ध झाला होता.
- वर्ष २००८-०९ ते २०१३-१४ या ६ वर्षाच्या कालावधीत सरासरी रु. ३९ हजार ६८४ कोटी योजनेसाठी अंदाजीत केले गेले व सरासरी केवळ रु. ३५ हजार ६३४ कोटी इतकाच निधी उपलब्ध झाला.
- वरील आलेख पाहता राज्य शासन मागील ६ वर्षात एकाही वर्षी अर्थसंकल्पीय अंदाजा इतका निधी **'राज्यातील योजनांसाठी'** उपलब्ध करुन देऊ शकले नाही.

# राज्यातील योजनांसाठी २५ टक्केही खर्च नाही!

आलेख क्र. २

**एकूण अर्थसंकल्पातील खर्चातील योजनांतर्गत व योजनेतर खर्च**




| | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ योजनांतर्गत | १९९९७ | २५६९२ | ३१८७९ | ३३२५६ | ३७५०७ | ४०३२३ | ४५१५२ | ६१५८४ | ७१६३७ |
| ■ योजनेतर | ६२५४६ | ७४९३० | ८५९०२ | ९७७४९ | १११७२१ | १२५१४५ | १४२८२९ | १६९३४७ | १७१३८८ |

स्रोत: खर्चाचे प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा

*टीप : वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज, वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज.)*

***योजनेतर खर्च :*** *योजनेतर खर्चात सर्वसाधारण पणे राज्याचे सर्व विकासेतर खर्च भागविले जातात. उदा. कर्मचाऱ्यांचे पगार, पेंन्शन कायदा सुव्यवस्था व कर वसूली यावर येणारा खर्च, सामान्य प्रशासनावर येणारा खर्च इत्यादी.*

***योजनांतर्गत खर्च:*** *राज्याच्या वार्षिक योजनेअंतर्गत असलेला खर्च हा खर्च संपुर्णपणे विकासात्मक खर्च असतो.*

- **वर्ष २०१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज रु. २ लाख ४३ हजार २६ कोटींचा** असला तरी त्यामध्ये योजनांतर्गत खर्च केवळ रु. ७१ हजार ६३७ कोटी (२९ %) इतकाच करण्यात आला आहे व **योजनेतर खर्च रु. १ लाख ७१ हजार ३८८ कोटी (७१ %) आहे.**
- वर्ष २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात योजनेतर खर्चाचे प्रमाण ७१ टक्के असून **योजनांतर्गत खर्चाचे प्रमाण केवळ २९ टक्के एवढे अल्प आहे.**
- वर्ष २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीत राज्याच्या एकूण अर्थसंकल्पामध्ये एकही वर्ष योजनांतर्गत खर्च ३० टक्के करण्यात आलेला नाही तर योजनेतर खर्च मात्र ७० टक्क्यांहून अधिक राहिला आहे.
- वर्ष २०१३-१४ मधील अर्थसंकल्पातून उपलब्ध झालेला निधी रु. १ लाख ८७ हजार ९८२ कोटी होता. त्यामध्ये योजनेतर खर्च रु. १ लाख ४२ हजार ८२९ कोटी (७५.९८ %) झाला तर योजनांतर्गत खर्च केवळ रु. ४५ हजार १५२ कोटी (२४.०२ %) झाला.
- वर्ष २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीत उपलब्ध झालेला एकूण सरासरी निधी रु. १ लाख ३३ हजार ५१८ कोटी एवढा होता. त्यात योजनेतर सरासरी खर्च रु. १ लाख ११७ कोटी एवढा झाला तर योजनांतर्गत सरासरी खर्च रु. ३३ हजार ४०१ कोटी एवढा झाला.

# राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान

आलेख क्र: ३ राज्य अर्थसंकल्पाचे वाढते आकारमान




| | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ८५६३७ | ९९५६३ | १२२९६३ | १२९५०० | १५४१२४ | १७०११० | १९४०६७ | २२४०५६ | २४३०२६ |
| सुधारित अंदाज | ८४२३३ | १०३४६१ | १२४६३३ | १३८५५२ | १५२८३९ | १७२०१८ | १९७१८७ | २३०९३२ | |
| प्रत्यक्ष खर्च | ८२५४४ | १००६२२ | ११७७८१ | १३१००५ | १४९२२८ | १६५४६८ | १८७९८२ | | |

*( स्रोत : वित्तविषयक विवरणपत्र,*
*टीप : वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज, वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज.)*

- वर्ष २०१५-१६ चा अर्थसंकल्प रु. २ लाख ४३ हजार २६ कोटींचा आहे. आधीच्या वर्षाच्या अर्थसंकल्पाशी म्हणजेच वर्ष २०१४-१५ च्या सुधारित अंदाजाशी तुलना करता रु.१२ हजार ९४ कोटींनी अधिक आहे.
- वर्ष २००७-०८ ते २०१२-१३ या कालखंडाचा विचार करता वर्ष २००७-०८, २००९-१०, वर्ष २०११-१२ व २०१२-१३ मधील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अनुक्रमे रु.३ हजार ०९३, रु. ५ हजार १८२ कोटी, रु. ४ हजार ८९६ कोटीं आणि रु. ४ हजार ६४२ कोटींने कमी झालेला होता. नुकत्याच प्रकाशित झालेल्या २०१३-१४ च्या आकडेवारीनुसार देखील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा रु. ६ हजार ८५ कोटींनी कमी झाला आहे.
- वर्ष २००७-०८ ते २०१३-१४ मधील प्रत्यक्ष खर्च सुद्धा नेहमीच सुधारित अंदाजापेक्षा कमी झालेला आढळतो. वर्ष २०१४-१५ मध्येही तोच कल कायम राहणाची शक्यता आहे.
- **वर्ष २०१३-१४ मध्ये प्रत्यक्ष खर्च सुधारित अंदाजापेक्षा रु. ९ हजार २०५ ने कमी झालेला आहे.**
- **सुधारित अंदाजांपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमी याचाच अर्थ निधीची उपलब्धता न झाल्याने खर्चाला लावलेली कात्री म्हणावी लागेल.**

# राजकोषीय स्थैर्य: आभास की वास्तव?

आलेख क्र: ४




| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजकोषीय तुट | ३.६ | २ | -०.४ | १.९ | ३.१ | १.८ | १.७ | १ | १.७ | २.२ | १.६ |
| महसुली तुट | ०.८ | -०.१ | -२.२ | -०.७ | ०.९ | ०.१ | ०.२ | -०.३ | ०.३ | ०.८ | ०.२ |

*(स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प वर्ष २०१४-१५ सुधारित व वर्ष २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज.)*

महसुली व राजकोषीय तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे शासनाच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार शासनास महसुली तूट २००८-०९ पर्यंत शून्यावर व राजकोषीय तूट राज्य स्थूल उत्पन्नाच्या प्रमाणात ३ टक्क्यांवर आणावयाची होती. वर्ष २००६-०७ पासून अनेक खटपटी करून शासनाने हे उद्दिष्ट साध्य केले होते.

- वर्ष २०१४-१५ चे सुधारित आणि वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज पाहता महसूली तुट अनुक्रमे ०.८ व ०.२ इतकी राहणार असून राजकोषीय तूट अनुक्रमे २.२ व १.६ इतकी असणार असे अंदाज दिलेले आहेत.

## राजकोषीय तूट महसुली तूट व स्थूल राज्य उत्पन्नातील बदलते स्वरुप

तक्ता क्र.१ (रु. कोटीत)

| वर्ष | राजकोषीय तूट (प्रमाण) | महसुली तूट (प्रमाण) | स्थूल राज्य उत्पन्न |
|---|---|---|---|
| २००५-०६ | १७६३०(३.६) | ३८४२ (०.८) | ४,८६,७६६ |
| २००६-०७ | ११५५३(२.०) | -८१०(-०.१) | ५,८४,४९८ |
| २००७-०८ | -२८२१ (-०.४) | -१४८०३(-२.२) | ६,८४,८१७ |
| २००८-०९ | १४०१७ (१.९) | -५५७७(-०.७) | ७,५३,९६९ |
| २००९-१० | २६१८१ (३.१) | ८००६ (०.९) | ८,५५,७५१ |
| २०१०-११ | १८८५७ (१.८) | ५९१ (०.१) | १०,४९,१५० |
| २०११-१२ | १९९६९ (१.७) | २२६८ (०.२) | ११,७०,१२१ |
| २०१२-१३ | १३७३९ (१.०) | -४२११ (-०.३) | १३,२२,२२२ |
| २०१३-१४ | २६०१८ (१.७) | ५०८१ (०.३) | १५,१०,१३२ |
| २०१४-१५ | ३७२४६ (२.२) | १३८८३ (०.८) | १६,८६,६९५ |
| २०१५-१६ | ३०७३३ (१.६) | ३७५७ (०.२) | १८,८९,०९८ |

*(कंसातील आकडे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण दर्शवितात. तक्ता व आलेख यांचा स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१४-१५ टीप : वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज, २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज)*

# एकूण खर्चामध्ये महसुली - भांडवली व विकास - विकासेतर खर्चाचा तपशील

*तक्ता क्र: २*          *रु. कोटीत*

| | महसूली खर्च | | | भांडवली खर्च | | | एकूण खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | विकास | विकासेतर | एकूण | विकास खर्च | विकासेतर | एकूण | विकास खर्च | विकासेतर खर्च | एकूण |
| २०००-०१ | २२६९८.८२ | १४७०२.१४ | ३७४००.९६ | ३७३६.९७ | ७०२१.९४ | १०७५८.९१ | २६४३५.७९ | २१७२४.०८ | ४८१५९.८७ |
| २००१-०२ | २०५५०.९८ | १७७३०.५४ | ३८२८१.५२ | ३००७.२७ | १३६२२.५५ | १६६२९.८२ | २३५५८.२५ | ३१३५३.०९ | ५४९११.३४ |
| २००२-०३ | २२५२७.५० | १७९४६.८ | ४०४७४.३० | ५३८७.७६ | १५३५२.८४ | २०७४०.६० | २७९१५.२६ | ३३२९९.६४ | ६१२१४.९० |
| २००३-०४ | २२८५९.९८ | १९८२०.०८ | ४२६८०.०६ | १०१०१.१३ | १७५७४.५४ | २७६७५.६७ | ३२९६१.११ | ३७३९४.६२ | ७०३५५.७३ |
| २००४-०५ | २८७७५.५१ | २२२७१.१५ | ५१०४६.६६ | १०६२७.६४ | १४५३१.८६ | २५१५९.५० | ३९४०३.१५ | ३६८०३.०१ | ७६२०६.१६ |
| २००५-०६ | ३०५८३.३४ | २१६९६.५१ | ५२२७९.८५ | १४३४०.०६ | ५७४१.६५ | २००८१.७१ | ४४९२३.४० | २७४३८.१६ | ७२३६१.५६ |
| २००६-०७ | ३६२७८.९८ | २५१०६.३० | ६१३८५.२८ | १२४१३.८० | ४७०६.४५ | १७१२०.२५ | ४८६९२.७८ | २९८१३.०५ | ७८५०५.८३ |
| २००७-०८ | ४०९३३.६३ | २३८४६.४२ | ६४७८०.०५ | १२७१४.७६ | ४६९९.११ | १७४१३.८७ | ५३६४८.३९ | २८५४५.५३ | ८२१९३.९२ |
| २००८-०९ | ४९१०९.२१ | २६५८४.७१ | ७५६९३.९२ | २०८०३.८० | ४२१४.५१ | २५०१८.३१ | ६९९१३.०१ | ३०७०९.२२ | १००६२२.२३ |
| २००९-१० | ६२८४५.०१ | ३२०७०.९६ | ९४९१५.९७ | १८६८९.७४ | ४१७५.३९ | २२८६५.१३ | ८१५३४.७४ | ३६२४६.३५ | ११७७८१.०९ |
| २०१०-११ | ६८७५५.१५ | ३७७०४.२३ | १०६४५९.३८ | १८९२२.४५ | ५६२३.६१ | २४५४६.०५ | ८७६७७.५९ | ४३३२७.८३ | १३१००५.४३ |
| २०११-१२ | ८०७०१.३१ | ४२८५२.८८ | १२३५५४.१९ | १८७१५.८२ | ६९५८.३५ | २५६७४.१८ | ९९४१७.१४ | ४९८११.२३ | १४९२२८.३७ |
| २०१२-१३ | ९१०७०.३१ | ४७६६५.६७ | १३८७३५.९८ | १८८१३.९२ | ७९१९.०२ | २६७३२.९४ | १०९८८४.२३ | ५५५८४.६८ | १६५४६८.९२ |
| २०१३-१४ | १००९२३.१५ | ५३९७९.२७ | १५४९०२.४२ | २१६६५.५४ | ११४१४.१९ | ३३०७९.७३ | १२२५८८.६९ | ६५३९३.४६ | १८७९८२.१५ |
| २०१४-१५ | १३१०७२.०२ | ६३६०५.२९ | १९४६७७.३१ | २४३९७.५१ | ११८५७.८१ | ३६२५५.३३ | १५५४६९.५३ | ७५४६३.१० | २३०९३२.६३ |
| २०१५-१६ | १२८१०५.०७ | ७३८८२.८३ | २०१९८७.९० | २८०७४.०६ | १२९६४.१३ | ४१०३८.१९ | १५६१७९.१३ | ८६८४६.९६ | २४३०२६.०९ |

*स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१४-१५ टीप :* वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज, २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज

- राज्याचा वर्ष २०१५-१६ मध्ये रु. २ लाख ४३ हजार २६ कोटींचा एकूण अंदाजित खर्च होईल असे शासन सांगत असून त्यामध्ये रु. २ लाख १ हजार ९८७ कोटींचा महसूली खर्च असून रु. ४१ हजार ३८ कोटींचा भांडवली खर्च आहे.
- राज्याचा वर्ष २०१३-१४ मधील प्रत्यक्ष खर्च पाहिला असता एकूण खर्च रु. १ लाख ८७ हजार ९८२ कोटी असून त्यामध्ये रु. ३३ हजार ०७९ कोटींचा भांडवली केलेला खर्च आहे व रु. १ लाख ५४ हजार ९०२ कोटींचा महसूली खर्च केलेला आहे.
- राज्याने वर्ष २०१३-१४ मध्ये एकूण खर्च रु. १ लाख ८७ हजार ९८२ कोटी असून त्यामध्ये रु.१ लाख २२ हाजर ५८८ कोटी विकास खर्च व रु. ६५ हजार ३९३ कोटी विकासेतर खर्च आहे.

## राज्याची पंचवार्षिक योजनाच बेपत्ता!

प्रत्येक ५ वर्षासाठी विकासाच्या प्राथमिकता ठरवून नियोजनबद्ध विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आपल्या देशाने पंचवार्षिक योजनेची संकल्पना स्वीकारलेली आहे. १०वी पंचवार्षिक योजना मार्च,२००७ रोजी संपली. वर्ष २००७-१२ हा अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी होता ती शासनाने जाहीर केली नाहीच परंतु १२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी (वर्ष २०१२-१७) सुरु झालेला असतानाही अजूनही शासनाने ती देखील जाहीर केलेली नाही. नियोजन विभागाने सदर योजनेसाठी साधे अभ्यासगट देखील नेमलेले नाहीत अशी माहिती माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त झाली आहे.

## राज्य शासनाने रु.५१ हजार ६४३ कोटी ६३ लाखाच्या महसूलावर पाणी सोडले

### निर्विवाद रकमांची वसुलीही विवादास्पद!

### ही तर फक्त निव्वळ वसुली पण त्यावरील व्याजाचे काय?

*तक्ता क्र. ३* *रु. कोटीत*

| तपशील | वर्ष २०१२-१३ | वर्ष २०१३-१४ | वाढ | वाढीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| कर महसुलातील वसूल न केलेल्या विवादास्पद रकमा | १९३१८.४६ | २४४६५.१८ | ५१४६.७२ | २१.०९ |
| कर महसुलातील वसूल न केलेल्या निर्विवाद रकमा | २००१६.५४ | २४२०२.७५ | ४१८६.२१ | १७.२९ |
| वसूल न केलेला करेतर महसूल | २९०२.३१ | २९७५.७० | ७३.३९ | २.४६ |
| **एकूण** | **४२२३७.३१** | **५१६४३.६३** | **९४०६.३२** | **१८.२१** |

*(स्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, २०१५-१६)*

- वर्ष २०१२-१३ पर्यंत वेगवेगळ्या करातून जमा होणारा कर त्या बाबतच्या विवादास्पद रकमा रु. १९ हजार ३१८ कोटी ४६ लाख इतक्या होत्या व निर्विवाद रकमा या रु. २० हजार १६ कोटी ५४ लाखांच्या होत्या त्यामध्ये वर्ष २०१३-१४ मध्ये वाढ होऊन त्या अनुक्रमे रु. २४ हजार ४६५ कोटी १८ लाख व रु. २४ हजार २०२ कोटी ७५ लाख इतक्या झाल्या आहेत.
- वर्ष २०१३-१४ मध्ये विवादास्पद व निर्विवाद रकमा मिळून रु. ४८ हजार ६६७ कोटींच्या रकमा शासन वसूलच करू शकलेली नाही.
- वर्ष २०१२-१३ पर्यंत वेगवेगळ्या करेतर महसुल अंतर्गत जमा होणारा कर रु. २ हजार ९०२ कोटी ३१ लाख शासन वसूलच करू शकलेले नव्हती व उलट त्यात वर्ष २०१३-१४ मध्ये ७३ कोटी ३९ लाखांची वाढ होऊन ती २ हजार ७५ कोटी ७० लाख इतकी झाली आहे.
- वर्ष २०१२-१३ मध्ये शासनाने रु. ४२ हजार २३७ कोटी ३१ लाखांचा कर व करेतर महसूल जमा केला नव्हता उलट त्यात १८.२१ टक्क्यांनी वाढ होऊन तो वर्ष २०१३-१४ मध्ये ५१ हजार ६४३ कोटी ६३ लाख इतका झाला आहे.

## श्रीमंत राजा अन् कर्जबाजारी प्रजा

### राज्यावरील कर्ज रु.३ लाख ६० हजार ८२३ कोटी!

*आलेख क्र: ५*




*टीप : वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज, २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज)*

***कर्जाच्या आकडेवारीमध्ये व्याजाची रक्कम घेण्यात आली आहे.***

- राज्याचा कर्जाचा आलेख हा सातत्याने वाढताना दिसतो. वर्ष २००७-०८ ते वर्ष २०१५-१६ मध्ये सरासरी कर्ज पहाता राज्याच्या डोक्यावर वर्षाला सरासरी रु. २ लाख ४८ हजार ४५३ कोटी २२ लाख इतके आहे.
- वर्ष २०१५-१६ मध्ये राज्याचे कर्ज ३ लाख ६० हजार ८२३ कोटी इतके अंदाजित करण्यात आले आहे.

# राज्यावरील सरासरी कर्जाचे प्रमाण स्थुल राज्य उत्पनाच्या २१ टक्यांपेक्षा जास्त

आलेख क्र: ६ राज्यावरील वाढत्या कर्जाचे स्थुल राज्य उत्पनाशी प्रमाण




*(स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प, २०१४-१५ (जून २०१४ अतिरिक्त) वर्ष २०१३-१४ सुधारित अंदाज, वर्ष २०१४-१५ अर्थसंकल्पीय अंदाज.)*

- राज्यावरील कर्ज व व्याजाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असणारे प्रमाण पाहता वर्ष २००६-०७ ते २०१५-१६ या कालावधीतील वर्ष २००९-१० मध्ये हे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच २२.९३ टक्के इतके होते.
- वर्ष २०१५-१६ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नामध्ये कर्ज व व्याजाचे प्रमाण सर्वात कमी म्हणजेच १९.१० टक्के इतके अंदाजित करण्यात आलेले आहे.

# राज्यातील प्रत्येक नागरीकावर ३२ हजार १०१ रुपयांचे कर्ज!

तक्ता क्र:४ राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच स्थुल राज्य उत्पन्न व दरडोई कर्ज

| वर्ष | राज्यावरील कर्ज व स्थुल राज्य उत्पन्न (रु. कोटीत) | | | | दरडोई कर्ज (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| | कर्ज | व्याज | एकूण कर्ज | स्थुल राज्य उत्पन्न | |
| २००५-०६ | १२४,३६५ | १०,५२३ | १३४,८८८ | ४८६,७६६ | १२,९५७ |
| २००६-०७ | १३३,७२२ | ११,९८३ | १४५,७०५ | ५८४,४९८ | १३,८९४ |
| २००७-०८ | १४२,३८२ | १२,९३२ | १५५,३१४ | ६८४,८१७ | १४,८५६ |
| २००८-०९ | १६०,६७३ | १३,०२७ | १७३,७०० | ७५३,९६९ | १५,८७७ |
| २००९-१० | १८१,४४७ | १४,८३८ | १९६,२८५ | ८५५,७५१ | १७,८९२ |
| २०१०-११ | २०३,०९७ | १५,६४८ | २१८,७४५ | १०,४९,१५० | १९,४६१ |
| २०११-१२ | २२५,९७६ | १७,५०५ | २४३,४८१ | ११,७०,१२१ | २१,६६२ |
| २०१२-१३ | २४६,६९२ | १९,०७६ | २६५,७६८ | १३,२२,२२२ | २३,६४५ |
| २०१३-१४ | २६९,३५५ | २१२०७ | २९०५६२ | १५,१०,१३२ | २५,८५० |
| २०१४-१५ | ३०२५७८ | २४२८३ | ३२६८६१ | १६,८६,६९५ | २९,०८० |
| २०१५-१६ | ३३३१६० | २७६६३ | ३६०८२३ | १८,८९,०९८ | ३२,१०१ |

*स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१५-१६ टीप :* वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज, २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज)

राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. युती शासनाकडून आघाडी शासनाच्या हाती सत्ता आली त्यावेळी राज्यावरील कर्जाचा बोजा रु. ४२ हजार ६६६ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या १७.२ टक्के) होता. वर्ष २००४-०५मध्ये आघाडी शासन दुसऱ्यांदा निवडून आले त्यावेळी हा बोजा रु. १ लाख ९ हजार १६७ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या २८.३ टक्के) एवढा वाढला होता. त्यावरील व्याज रु. १० हजार २५८ कोटी मिळून एकूण कर्ज १ लाख १९ हजार ४२५ कोटी रुपये इतके झाले होते. आता युती शासनाकडे पुन्हा राज्याची धुरा आलेली असताना राज्यावरील कर्ज हे चक्क ३ लाख ६० हजार ८२३ कोटींचे आहे.

वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्यावरील कर्ज रु. ३ लाख ३३ हजार १६० कोटी एवढे असेल व त्यावर शासन रु. २७ हजार ६६३ कोटी व्याज भरेल त्याकारणाने एकूण कर्ज व व्याज मिळून ३ लाख ६० हजार ८२३ कोटी इतके राहील.

**राज्यातील प्रत्येक व्यक्तीवर असलेला कर्जाचा भार हा जवळ जवळ ३२ हजार १०१ रुपये इतका आहे!**

# राज्याच्या दरडोई जिल्हा उत्पन्नाबाबत राज्याचा असमतोल विकास

आलेख क्र. ७




(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१४-१५)

- सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे हिंगोली (रू. ५३,७८०), नंदुरबार (रू. ५६,५२१), गडचिरोली (रू ५८,६०३), असून पुणे (रू. १,७१,६३६), ठाणे (रू. १,७३,१५०) व मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक रुपये १ लाख ८८ हजार ७३९ इतके आहे.
- मुंबई, ठाणे व पुणे येथील महानगरांचे दरडोई उत्पन्न आणि ग्रामीण जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी निर्माण करते.

# राज्यातील कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्या वेतनावरील खर्च

तक्ता क्र:५

| वर्ष २०१३-१४ | | |
|---|---|---|
| **कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग** | **कर्मचाऱ्यांची संख्या** | **वेतनावरील खर्च (कोटीत)** |
| शासन | ५४९६१२ | २१४३२.२० |
| शासकीय अनुदान प्राप्त संस्था | ९९७४०३ | ३७३१८.५१ |
| सार्वजनिक क्षेत्रातील युनिटे | २४५७१६ | १०६८७.६८ |
| एकूण | १७९२७३१ | ६९४३८.३९ |

**स्त्रोत:मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण**

राज्याच्या एकूण अर्थसंकल्प रु. २ लाख ४३ हजार २६ कोटींचा मांडण्यात आलेला आहे. मात्र त्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनावर तब्बल रु. ६९ हजार ४३८ कोटी ३९ लाख इतका खर्च होणार आहे. याचाच अर्थ शासन जवळपास २८ टक्के खर्च हा केवळ वेतनावर करणार.

**स्थुल राज्य उत्पन्न, महसूली व राजकोषिय तुट:**

- वर्ष २०१५-१६ चे राज्याचे स्थुल राज्य उत्पन्न हे रु. १८ लाख ८९ हजार ९८ कोटी इतके अंदाजित असून राज्य स्थुल उत्पन्नाशी महसूली तुटीचे प्रमाण हे ०.२ आहे तर राजकोषिय तुटीचे प्रमाण हे १.६ इतके आहे.
- वर्ष २०१५-१६ ची महसूली तुट रु. ३ हजार ७५७ कोटी तर राजकोषीय तुट ही रु. ३० हजार ७३३ कोटी इतकी आहे.

**कर्ज व व्याज :-**

- वर्ष २०११-१२ मध्ये राज्यावर एकूण कर्ज (व्याजासहीत) रु २ लाख ४३ हजार ४८१ कोटींचे कर्ज होते ते वर्ष २०१२-१३ मध्ये रु २ लाख ५६ हजार ७६८ कोटी इतके वाढले होते. राज्यावरील कर्जाचा बोझा हा वाढताच दिसतोय कारण आता वर्ष २०१५-१६ मधील अंदाज पाहता ते कर्ज रु. ३ लाख ६० हजार ८२३ कोटींवर आले आहे.
- राज्याचे कर्जावरील व्याज देखील वाढत आहे ते वर्ष २०११-१२ मध्ये रु १७ हजार ५०५ कोटी होते ते वर्ष २०१२-१३ मध्ये रु. १९ हजार ७६ कोटींचे झाले होते व २०१५-१६ चे अंदाज पाहिले असता रु २७ हजार ६६३ कोटींचे व्याज राज्याच्या कर्जावर आहे.
- राज्याचे स्थुल राज्य उत्पन्न वर्ष २०१५-१६ मध्ये १८ लाख ८९ हजार ९८ कोटींचे असले तरी त्यात १७.३६ % कर्ज व १.४६% व्याज आहे.

## महसूली जमा व महसूली खर्च

तक्ता क्र.६ महसूली जमा व खर्चाचे विवरण रु. कोटीत

| बाब | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|
| महसूली जमा | १४२९४७ | १४९८२२ | १८०७९४ | १९८२३१ |
| महसूली खर्च | १३८७३६ | १५४९०२ | १९४६७७ | २०१९८८ |
| वेतनावरील खर्च | ५३२९५ | ५९७३५ | ६६२१३ | ७३४३८ |
| निवृत्तीवेतनावरील खर्च | १३४३० | १५१८६ | १७६६३ | १९९२९ |
| व्याज | १९०७६ | २१२०७ | २४२८३ | २७६६३ |
| वेतन+निवृत्तीवेतन+व्याज | ८५८०१ | ९६१२८ | १०८१५९ | १२१०३० |
| महसूली आधिक्य (+) तूट (-) | -४२११ | ५०८१ | १३८८३ | ३७५७ |

(स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प, वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज, २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज.)

- महसूली जमा व खर्च पाहिले असता राज्य शासनाने वर्ष २०१५-१६ मध्ये वार्षिक खर्च रु. २ लाख १ हजार ९८८ कोटी इतका होईल व रु. १ लाख ९८ हजार २३१ कोटींचा महसूल जमा होईल असे अंदाज वर्तविले आहेत. याचाच अर्थ राज्य शासन राज्याच्या एकूण महसूली खर्चा एवढा महसूल जमा करण्यास असमर्थ असल्याचे त्यांच्याच आकडेवारीवरुन दिसते.
- वर्ष २०१३-१४ च्या प्रत्यक्ष रकमा पाहता राज्यशासनाचे महसूली खर्च हा जमेपेक्षा ३ टक्के जास्तच आहे.

## वर्षभर खर्च कमी व शेवटच्या महिन्यात मात्र खर्चाची घाई!

### वर्ष २०१२-१३ च्या शेवटच्या तिमाहीत आणि शेवटच्या महिन्यांत केलेला तातडीचा खर्च.

१०७ उपशीर्षांतर्गत रु १० कोटींहून अधिक व वर्षाच्या एकूण खर्चाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त खर्च मार्च २०१३ मध्ये करण्यात आला होता.

तक्ता क्र ७ रु. कोटीत

| अक्र. | मुख्य लेखाशीर्ष | वर्षातील एकूण खर्च | वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतील खर्च | | मार्च २०१३ मधील खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूण खर्चाची % | रक्कम | एकूण खर्चाची % |
| १. | २०५९ - सार्वजनिक बांधकाम | १४.३७ | १४.३७ | १००.०० | १४.२८ | ९९.३७ |
| २. | २०७० - इतर प्रशासकीय सेवा | ०.१५ | ०.१५ | १००.०० | ०.१५ | १००.०० |
| ३. | २०७५ - संकीर्ण सर्वसाधारण सेवा | १७७.१४ | ९९.३४ | ५६.०८ | ९८.८७ | ५५.८१ |
| ४. | २२०२ - सामान्य शिक्षण | ०.२८ | ०.१९ | ६७.८६ | ०.१५ | ५३.५७ |
| ५. | २२०३ - तंत्र शिक्षण | १.४६ | १.२६ | ८६.३० | ०.९७ | ६६.४४ |
| ६. | २२०४ - क्रीडा आणि सार्वजनिक आरोग्य | २५८.७५ | १५८.१६ | ६१.१२ | १३१.२७ | ५०.७३ |
| ७. | २२१० - वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य | ३.२२ | २.९० | ९०.०६ | २.१९ | ६८.०१ |
| ८. | २२१६ - गृहनिर्माण | ४६८.८१ | २९५.४५ | ६३.०२ | २७८.४० | ५९.३८ |
| ९. | २२३० - कामगार आणि रोजगार | १.९९ | १.९५ | ९७.९९ | १.६३ | ८१.९१ |
| १०. | २२३५ - सामाजिक सुरक्षा आणि कल्याण | ०.९६ | ०.६३ | ६५.६३ | ०.५२ | ५४.१७ |
| ११. | २२४५ - नैसर्गिक आपत्तीसाठी मदत | ५०९६.७७ | ३४८३.५४ | ६८.३५ | ३१९९.२७ | ६२.७७ |
| १२. | २४०३ - पशुसंवर्धन | २.२० | २.१९ | ९९.५५ | १.९० | ८६.३६ |
| १३. | २४०५ - मत्स्यव्यवसाय | १.२० | १.१८ | ९८.३३ | ०.९६ | ८०.०० |
| १४. | ३०५१ - बंदरे आणि दीपगृहे | १.०५ | ०.९९ | ९४.२९ | ०.९९ | ९४.२९ |
| १५. | ४२१७ - नगर विकासावरील भांडवली खर्च | १७०.६३ | १६२.९७ | ९५.५१ | १५७.९७ | ९२.५८ |
| १६. | ४२३६ - पोषक आहारावरील भांडवली खर्च | ६०.०० | ६०.०० | १००.०० | ६०.०० | १००.०० |
| १७. | ४२५० - इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च | ६.४१ | ५.०५ | ७८.७८ | ४.५१ | ७०.३६ |
| १८. | ४४०२ - मृद आणि जलसंधारणावरील भांडवली खर्च | ७४८.८७ | ४७०.०२ | ६२.७६ | ३८२.०९ | ५१.०२ |
| १९. | ४४२५ - सहकारावरील भांडवली खर्च | १५९.६२ | ८४.९७ | ५३.२३ | ८४.९६ | ५३.२३ |
| २०. | ४७०१ - मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च | ८१.२७ | ८१.१८ | ९९.८९ | ८०८२ | ९९.४५ |
| २१. | ४७११ - पूर नियंत्रण योजनेवरील भांडवली खर्च | २३.३९ | २२.११ | ९४.५३ | २१.५६ | ९२.१८ |
| २२. | ५४५२ - पर्यटनावरील भांडवली खर्च | ०.४० | ०.४० | १००.०० | ०.४० | १००.०० |
| २३. | ६००३ - राज्य शासनाचे अंतर्गत कर्ज | ११६.७८ | ७६.०२ | ६५.१० | ७६.०२ | ६५.१० |
| २४. | ६२१७ - नगर विकासासाठी कर्ज | ४७.०३ | ४४.९३ | ९५.५३ | ३८.५९ | ८२.०५ |
| २५. | ६४०१ - पीक संवर्धनासाठी कर्ज | ४.५९ | ४.५९ | १००.०० | ४.५९ | १००.०० |
| २६. | ७४७५ - इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांसाठी कर्जे | १७९.०२ | १७९.०२ | १००.०० | १७९.०२ | १००.०० |
| २७. | ७६१० - सरकारी कर्मचारी इत्यादींना कर्जे | ७७.५८ | ५४.१० | ६९.७३ | ५०.२५ | ६४.७७ |

स्त्रोत : विनियोजन लेखे, मार्च २०१३ करिताचे मासिक नागरी लेखे आणि प्रधान महालेखाकार (लेख आणि अनुज्ञेयता)-I आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)- II, नागपूर यांच्याकडून मिळालेली माहिती.

- मागील अनेक वर्ष भारताचे नियंत्रक व लेखापरिक्षक यांनी तातडीने होणाऱ्या खर्चाबाबत विभागांवर सातत्याने ताशेरे ओढले असले तरीही विभागांमध्ये मात्र काहीही बदल झालेला दिसत नाही. कारण वर्ष २०१२-१३ च्या शेवटच्या तीमाहितील खर्च पाहिला असता काही महत्त्वाच्या मुख्यशीर्षावर देखील तातडीनेच खर्च केल्याचे दिसत आहे. त्यामध्ये सामान्य शिक्षण या लेखाशीर्षावर ६७ टक्के, सार्वजनिक आरोग्यावर ६१ टक्के, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावर ९० टक्के, कामगार व रोजगारावर ९८ टक्के, पोषक आहारासाठी भांडवली खर्च चक्क शेवटच्या महिन्यात १०० टक्के खर्च करण्यात आलेला होता. पीक संवर्धनासाठी कर्ज देखील देण्यासाठी शेवटच्या मार्च महिन्यात १०० टक्के खर्च करण्यात आलेला आहे.
- मुंबई वित्तीय नियम, १९५६ नुसार, वित्तीय वर्षाच्या अखेरच्या महिन्यात होणारा तातडीचा खर्च टाळणे आवश्यक असून ही पद्धत बंद करण्यासाठी अधिकाऱ्यांची याप्रती असलेली उदासिनता बदलण्याची आवश्यकता आहे. राज्यात योग्य अर्थसंकल्पीय नियंत्रण आणण्यासाठी सध्याच्या शासनास काही ठोस व धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील जेणेकरुन यंदाच्या वर्षी तरी अशापद्धतीचे गैरव्यवहार दिसणार नाहीत.